Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 16 June 2024
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – १६ जून २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- राज्यभरातल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी एसटी महामंडळाची पास थेट तुमच्या शाळेत मोहीम.
- ईद उल जुहा अर्थात बकरी ईदच्या पवित्र सणाला प्रारंभ-राज्यपालांच्या शुभेच्छा.
- छत्रपती संभाजीनगर इथं `विकसित मराठवाडा २०४७` या एक दिवसीय चर्चासत्राचं आयोजन.

आणि

- अहमदनगर इथं जिलेटीन कांड्याच्या स्फोटात तीन कामगारांचा मृत्यू.

****

राज्यभरातल्या शालेय तसंच महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींना त्यांच्या शिक्षण संस्थेतच आवश्यकतेनुसार एसटीचा पास उपलब्ध करून दिला जाणार आहे. राज्यमार्ग परिवहन महामंडळ-एसटीचे उपाध्यक्ष तसंच व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी संबंधितांना याबाबत सूचना दिल्या आहेत. यासाठी एसटी पास थेट तुमच्या शाळेत " ही विशेष मोहीम परवा १८ जूनपासून राबवण्यात येत आहे. सर्व शाळा महाविद्यालयाचे मुख्याध्यापक तसंच प्राचार्य यांना इच्छुक विद्यार्थी विद्यार्थिनींची यादी तयार ठेवण्यास सांगण्यात आलं आहे. विद्यार्थ्यांना घरापासून शाळा-महाविद्यालयात जाण्यासाठी एसटी महामंडळाकडून पासच्या माध्यमातून प्रवासभाड्यात ६६ टक्के सवलत दिली जाते. शिवाय शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पास दिला जातो.

छत्रपती संभाजीनगर इथं एसटी महामंडळाने कालपासून या पास वाटप उपक्रमाला सुरुवात केली. जिल्ह्यात चौका इथल्या न्यू हायस्कूल इथं एसटीचे विभागीय नियंत्रक सचिन क्षीरसागर, आगार व्यवस्थापक संगीता सूर्यवंशी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पासवाटन करण्यात आलं.

****

१८ व्या मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज दुसऱ्या दिवशी डॉक फिल्म बझारचं उद्घाटन करण्यात आलं. यंदा पहिल्यांदाच भरवण्यात आलेल्या या डॉक फिल्म बाजारचं वेब सीरीज निर्मात्या आणि एमी पुरस्कार विजेत्या अपूर्वा बक्षी यांनी उद्घाटन झालं. पत्र सूचना कार्यालयाच्या अतिरिक्त महासंचालक स्मिता वत्स-शर्मा आणि महोत्सवाचे संचालक पृथुल कुमार यावेळी उपस्थित होते. नवोदित माहितीपट निर्मात्यांसाठी एक व्यासपीठ या प्रदर्शनामुळे उपलब्ध झालं आहे.

****

राज्यशासन अधिकारी महासंघाच्या मागण्यांबद्दल राज्यशासन सकारात्मक असून त्याबद्दल लवकर निर्णय घेतला जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्याची माहिती अधिकारी महासंघाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. सेवानिवृत्तीचं वय साठ वर्षे करावं, केंद्राच्या धर्तीवर महागाई भत्त्यात वाढ, अतिरिक्त सचिव पदांची निर्मिती तसंच रिक्त पदांची भरती, इत्यादी महासंघाच्या मागण्या आहेत. आचारसंहितेमुळे प्रलंबित राहिलेल्या या मागण्यांवर तातडीनं निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांसोबत शुक्रवारी चर्चा झाल्याची माहिती अधिकारी महासंघाने या पत्रकात दिली आहे.

****

पवित्र अमरनाथ यात्रा या महिन्याच्या २९ तारखेला सुरू होणार असून १९ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. यापार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक घेतली. बैठकीदरम्यान, शहा यांनी काश्मीरमध्ये अलीकडेच झालेल्या दहशतवादी हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. या बैठकीत राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल, जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, यांच्यासह लष्कर आणि प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते.

****

गंगा दशहरा पर्वाची आज समाप्ती झाली. यानिमित्त आज भाविकांनी गंगाकाठावरील प्रयागराज, वाराणसी, हरिद्वारसह विविध घाटांवर मोठी गर्दी करत श्रद्धेनं स्नान केलं. भगिरथानं स्वर्गातून आणलेली पवित्र गंगा नदी आजच्या दिवशी पृथ्वीवर अवतरित झाल्याची मान्यता आहे, त्या निमित्तानं हे पर्व साजरं केलं जातं.

****

संयुक्त अरब अमीरात तसंच जगभरात ईद उल जुहा अर्थात बकरीईदच्या पवित्र सणाला प्रारंभ होत आहे. त्यागाची शिकवण देणारा हा सण महाराष्ट्रात उद्या साजरा होणार आहे. राज्यपाल रमेश बैस यांनी बकरी ईद निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. ईद अल – अझा हा सण त्याग, करुणा आणि परोपकाराचा संदेश देतो. या सणा निमित्त उदात्त मूल्यांच्या जपणुकीसाठी प्रयत्न करण्याचा संकल्प करण्याचं आवाहन राज्यपालांनी संदेशात केलं आहे.

छत्रपती संभाजीनगर इथं या सणाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून सर्व नियोजन करण्यात आलं आहे. नागरिकांनी हा सण शांततामय वातावरणात साजरा करण्याचं आवाहन पोलिस अधीक्षक मनीष कलवानिया यांनी केलं आहे...

**सण साजरे करताना शांतता आणि सौहार्द्र जपणे आवश्यक आहे. सर्वांनी कायद्याचे पालन करने आणि एकमेकांचा आदर राखणे हे आपले कर्तव्य आहे. सण उत्सवामध्ये कोणताही अनुचित प्रकार होणार नाही, याची काळजी घेण्यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत. आपण सर्वांनी एकत्र येऊन अशा सण उत्सवाच्या काळामध्ये कुणीही आक्षेपार्ह पोस्ट किंवा वर्तन करुन सामाजिक सलोखा बिघडवण्याचा प्रयत्न करु नये.**

****

गुरांची वाहतूक करणाऱ्या मालवाहू ट्रकवर सिंधुदूर्ग जिल्ह्यात आंबोली पोलीसांनी धडक कारवाई केली आहे. या कारवाईत कर्नाटक इथल्या चार जणांना ताब्यात घेण्यात आल असून इनोव्हा कार, ट्रक आणि नऊ बैल असा मिळून एकूण २९ लाख ८ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

****

येत्या २१ जून रोजी साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची तयारी जगभरात मोठ्या उत्साहात सुरु आहे. यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पादहस्तासनावरील एक चित्रफित सामाजिक माध्यमांवर सामायिक केली आहे. पाठीचा कणा लवचिक

होण्यासाठी या आसनाचा सर्वांनी सराव करावा असं आवाहन पंतप्रधानांनी केलं आहे.

दरम्यान, सलग तिसऱ्या कार्यकाळासाठी पदाची शपथ घेतल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमाच्या १११व्या भागात या महिन्याच्या अखेरच्या रविवारी, येत्या ३० जूनला देशवासियांशी संवाद साधणार आहेत.

या कार्यक्रमासाठी नागरिकांनी आपले विचार आणि सूचना १८००-११-७८०० या टोल फ्री क्रमांकावर तसंच नरेंद्र मोदी ॲप किंवा माय गोव्ह खुल्या मंचावर येत्या २८ जूनपर्यंत कळवाव्यात, असं आवाहन करण्यात आलं आहे.

****

मराठवाड्यात धोरणात्मक गुंतवणूक आणि औद्योगिक विकासासंदर्भात चर्चेसाठी छत्रपती संभाजीनगर इथं 'विकसित मराठवाडा २०४७' या एक दिवसीय चर्चासत्राचं आयोजन करण्यात आलं आहे. येत्या १९ जून रोजी सकाळी ११ ते सायंकाळी पाच या वेळेत बीड वळण रस्त्यावरच्या एमआयटी महाविद्यालयात हे एक दिवसीय चर्चासत्र होणार आहे. महाराष्ट्र इन्स्टिटयूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन- मित्र ही संस्था आणि महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ ह्यांच्या संयुक्त विद्यमानं तसंच छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या सहकार्याने हे चर्चासत्र आयोजित करण्यात आलं आहे.

यामध्ये उद्योजक, शिक्षणतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ, संशोधक, अर्थतज्ज्ञ, तसंच शासकीय वरिष्ठ अधिकारी सहभागी होणार आहेत. मराठवाड्याच्या विकासाला गती देण्यासाठी आणि सार्वजनिक आणि खाजगी भागधारकांना भेडसावणाऱ्या समस्यांचं निराकरण करण्यासाठी धोरणं शोधणं हा या चर्चासत्राचा उद्देश आहे.

****

धाराशिवसह महाराष्ट्रात आणि पर्यायानं देशात शेतकऱ्यांसाठी विशेषत: महिला शेतकऱ्यांसाठीच्या योजना राबवण्यावर भर देण्याचा मानस, इफ्कोच्या संचालक डॉक्टर वर्षा कस्तुरकर यांनी व्यक्त केला आहे. इफ्कोच्या संचालक पदी निवड झाल्याबद्दल डॉ कस्तुरकर यांचा आज सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री संजय पाचपोर यांच्या हस्ते धाराशिव इथं सत्कार करण्यात आला, त्यावेळी त्या बोलत होत्या. सत्काराला उत्तर देताना डॉक्टर कस्तुरकर यांनी, देशपातळीवरील सर्वात मोठ्या सहकारी संस्थेची संचालिका म्हणून काम करण्याची संधी सहकार भारतीमुळे

मिळाल्या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली. पाचपोर यांनी यावेळी बोलतांना, राज्यात सहकार क्षेत्र समृद्ध आणि सक्षम करण्यासाठी राबवत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली.

****

अहमदनगर इथं विहिरीचे खोदकाम सुरू असताना जिलेटीनच्या कांड्याचा स्फोट होऊन तीन कामगारांचा जागीच मृत्यू झाला. श्रीगोंदा तालुक्यात टाकळी कडेवळी येथे ही घटना घडली. गणेश वाळुंज, नागनाथ गावडे, सूरज इनामदार अशी मृत मजुरांची नावे आहेत. या घटनेत दोघे जखमी झाले आहेत. या मजुरांनी विहिरीत जिलेटीनच्या कांड्या लावल्या. मात्र मजूर बाहेर येण्याआधीच या कांड्यांचा स्फोट झाल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर इथं आज सकल धनगर समाजाच्या वतीनं बैठक घेण्यात आली. धनगर समाजातील तसंच सर्व भटक्या विमुक्त जाती जमातीतील तरुणांसाठी विविध मागण्या राज्य सरकारकडे करण्यात आल्या. यामध्ये अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर तीस लाखापर्यंतचं बिनव्याजी कर्ज, पंढरपूर इथं पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर भावनासाठी जागा तसंच पाच कोटींचा निधी , अहिल्यादेवी घरकुल योजनेचे निकष बदलून तात्काळ योजना सुरू करणं, आदी मागण्यांचा समावेश आहे. मागण्यांच्या पूर्ततेसाठी राज्यभर आंदोलनाचा इशाराही या बैठकीत देण्यात आला.

****

लातूर जिल्ह्यातील इयत्ता दहावी, बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक प्रवेशासाठी आवश्यक दाखले –प्रमाणपत्रं त्यांच्या जवळच्या परिसरात उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. त्यासाठी येत्या १८ जून ते दोन जुलैदरम्यान महाराजस्व अभियान राबवलं जाणार आहे. लातूर तालुक्यात या कालावधीत ६६ महा ई–सेवा केंद्रांद्वारे लातूरच्या दहा शाळा, अन्य आठ महसूल मंडळात होणाऱ्या शिबिरांतून दहा हजार प्रमाणपत्रं वितरणाचं प्रशासनाचं उद्दीष्ट आहे.

****